**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.</u>**

दि. १६.०६.२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थाई समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सौ. अनुजा अमितसिंह तेहरा, सभापती**

**<u>सर्वश्री</u>**

| | |
|---|---|
| मोरे संजय गंगाधर | अन्नेवार गंगासागर संदिप |
| इंदुबाई शिवाजीराव घोगरे | प्रविण बालाप्रसाद बियाणी |
| विनयकुमार गुर्रम | संगिता पृथ्वीराज राओत्रे |
| ज्योती महेंद्र खेडकर | कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम |
| कदम गंगाबाई नारायण | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| फारुख हुसेन कासीम साब | जकीया बेगम स. मुखतार |

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य, प्राधिकारी अधिकारी तथा उपआयुक्त (विकास) श्री रत्नाकर वाघमारे, मुख्य लेखा परिक्षक श्री आर.एस.कोलगणे, प्र.उपआयुक्त श्री मुंढे, मुख्यलेखाधिकारी श्री कंदेवाड, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. मो.आसीफ, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, कार्यकारी अभियंता बिएसयुपी श्री प्रकाश कांबळे व सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात येते.

आजच्या सभेस सर्व विभाग प्रमुखांनी / अधिकारी वर्गाने उपस्थीत राहणे आवश्यक आहे. आजच्या बैठकीस अधिकारी वर्ग हा उपस्थीत आहे काय ? याबाबतची चौकशी करण्यात आली, आज मला श्री येवले प्रकाश, सहाय्यक आयुक्त यांनी मला एसएमएस टाकला की, कोर्टाच्या कामामुळे स्थाई समितीच्या सभेस उपस्थित राहु शकत नाही. श्री येवले प्रकाश स.आयुक्त हे मागील झालेल्या स्थाई समितीच्या बैठकीस अनुपस्थित होते, स्थायी समितीच्या बैठकीस ते वारंवार उपस्थित राहत नाहीत हे योग्य नाही. या नंतर होणा-या बैठकीस ते उपस्थित राहीले नाही तर अशा परिस्थितीत त्यांच्यावर कार्यवाही प्रस्तावित करण्याचे आदेश देण्यात येतील. आज ज्या त्यांना कोर्टाचे काम असु शकते, ही बाब बरोबर देखील असु शकते. इतरही अधिकारी वर्गाने सुध्दा बैठकीस उपस्थित राहीले पाहिजे यासाठी नगरसचिव मनपा नांदेड यांनी काळजी घेतली पाहीजे.

**विनय गुर्रम** आपल्या नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेला नव्याने आदेश प्राप्त झाला आहे की, नवे आयुक्त श्री समिर उन्हाळे यांची महाराष्ट्र शासनाने मनपाचे आयुक्त म्हणून प्रतिनियुक्तीने पाठविलेले आहे. श्री समीर उन्हाळे आयुक्त मनपा नांदेड यांची प्रतिनियुक्तीने मनपाकेत सेवेबाबत आदेश झालेला असल्यामुळे त्यांच्या अभिनंदनाचा ठराव येथे पारीत करण्यात यावा.

**श्री उमेश चव्हाण** नविन आयुक्त साहेब श्री समिर उन्हाळे यांच्या ठराव पारित करण्यास काहीही हरकत नाही. नविन आयुक्त साहेबांना मला वाटते रुजू झाल्याबरोबर आपल्या समितीकडून त्यांचा अभिनंदनाचा ठराव पारीत करु. त्यांना कामावर रुजू होवू दयावे असे मला वाटते.

**सभापती** मा. श्री समीर उन्हाळे यांना महाराष्ट्र शासनाने कालच मनपाचे आयुक्त या पदी प्रतिनियुक्तीने पदस्थापना केलेली आहे. त्यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके च्या आयुक्त या पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर आपण त्यांचा अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात येईल. तो पर्यत अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात येणार नाही.

**विनय गुर्रम** मागील बैठकीत तुरटीच्या दर्जा बाबत एक उप समिती नेमण्यात आली होती. आणि उप समितीस अहवाल देण्यास सांगण्यात आले होते. म्हणून आज नेमण्यात आलेल्या उप समितीचा अहवाल मी स्थायी समितीच्या सभापती यांच्याकडे सादर करीत आहे. उप समितीचा अहवाल त्यांनी स्विकारावा अशी मी विनंती करतो.

**सभापती** स्थायी समितीने तुरटीच्या दर्जा संदर्भात एक उप समिती नियुक्त केली होती त्या उप समितीचा अहवाल आजच्या सभेत स्विकार करते. सदरील अहवालाच्या प्रती या नियमानुसार सर्व संबधीतास देण्यात याव्यात.

**विनय गुर्रम** मनपाकेस पुरवठा केलेल्या तुरटीच्या संदर्भात आक्षेप असल्याने त्या संबधीत तुरटी कंत्राटदारास पेंमेट देण्यात येवू नये. कारण जो तुरटी पुरवठा करतो तो मुळ कंत्राटदार नसुन तो केवळ डीलर आहे. त्यामुळे डीलरने जी तुरटी पुरवठा केली आहे ती तुरटी ही ग्रेड बी ची आहे. मनपाने ज्या वेळी निविदा प्रसिध्द केल्या त्यावेळी ए ग्रेडची तूरटी पुरवठा केली पाहिजे अशी निविदेत अट आहे. परंतु

कंत्राटदाराने ए ग्रेडची तुरटी पुरवठा न करता बी ग्रेडची तुरटी पुरवठा केल्यामुळे मनपाची फसवणुक केली आहे. त्यामुळे संबधीतावर कार्यवाही झाली पाहीजे.

**विनय गुर्रम** सभापती साहेब तुरटी नमुण्याचा चौकशी अहवाल आपल्याकडे सादर करीत आहेत.

**सभापती** उपसमितीचा अहवाल व तुरटी नमुण्याचा तपासणी अहवाल जो शासकिय प्रयोग शाळे मार्फत आलेला आहे या सर्व बाबींचा विचार करता महापालिकेस पुरवठा करण्यात येत आलेली तुरटी **Tender Notice** मध्ये नमुद **Criteria** पूर्ण करत नाही त्यामुहे सध्या जो पुरवठाधारक तुरटी पुरवठा करत आहे तो तात्काळ थांबविण्यात यावा व आवश्यकती तुरटी खुल्या बाजारातुन खरेदी करण्यात यावी व यावर होणारा खर्च सध्याच्या पुरवठाधारकाच्या देयकातुन वळता करण्यात यावा तसेच ज्या कांही अनियमीतता झालेल्या आहेत त्याकरिता जबाबदार असणा-या कर्मचारी व अधिकारी यांनी उक्त प्रकरणात केलेल्या प्रकरणाची चौकशी करण्या करिता मुख्यलेखाधिकारी श्री कंदेवार यांची नियुक्ती करण्यात येते मुख्यलेखाधिकारी यांनी निविदा लिपीकापासून ते सर्वांची सखोल चौकशी करुन चौकशी अहवाल निष्कषांसहित १५ दिवसाच्या आत स्थायी समिती समोर सादर करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ५०** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पाणी पुरवठा या विभागासाठी तुरटी बाबत प्रशासनाने जो नमुण्याचा तपासणी अहवाल जो शासकिय प्रयोग शाळे मार्फत आलेला आहे या सर्व बाबींचा विचार करता महापालिकेस पुरवठा करण्यात येत असलेली तुरटी **Tender Notice** मध्ये नमुद **Criteria** पूर्ण करत नाही त्यामुळे सध्या जो पुरवठाधारक तुरटी पुरवठा करत आहे तो तात्काळ थांबविण्यात यावा व आवश्यकती तुरटी खुल्या बाजारातुन खरेदी करण्यात यावी व यावर होणारा खर्च सध्याच्या पुरवठाधारकाच्या देयकातुन वळती करण्यात यावा. तसेच सदरील प्रकरणात ज्या कांही अनियमीतता झालेल्या आहेत त्याकरिता जबाबदार असणा-या कर्मचारी व अधिकारी यांनी उक्त प्रकरणात केलेल्या प्रकरणाची चौकशी करण्या करिता मुख्यलेखाधिकारी श्री कंदेवार यांची नियुक्ती करण्यात येते मुख्यलेखाधिकारी यांनी निविदा लिपीकापासून ते सर्वांची सखोल चौकशी करुन चौकशी अहवाल निष्कषांसहित १५ दिवसाच्या आत स्थायी समिती समोर सादर करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सभापती** मागील मिटींगमध्ये मी काही सुचना केल्या होत्या त्या सुचनेची काय अंमलबजावणी केली आहे याची माहीती समितीस देण्यात यावी. मागील बैठकीत इमारत बांधकाम परवाना निर्गमित करीत असतांना सर्व मालमत्ता धारकांस त्यांच्या घराचे बांधकाम पुर्ण करण्याबरोबर रेन वॉटर हारवेंस्टींग करणे बंधन कारक आहे. त्यासाठी मनपा ही मालमत्ता धारकाकडून रेन वॉटर हारवेस्टींग करण्यासाठी लागणारी अनामत रक्कम वसुल करते.अशा किती इमारतीचे रेन वॉटर हारवेंस्टींग करण्यात आले याबाबतची माहिती देण्यात यावी.

**प्रभारी नगर रचनकार** सध्या मा. जिल्हाधिकारी तथा आयुक्त महोदयांच्या निर्देशानुसार पाण्याची टंचाई असल्याकारणाने इमारत बांधकाम परवानगी दिनांक 15 जुन 2016 पर्यत निर्गमित करण्यात येवू नये असे आदेश आहेत. त्यामुळे बांधकाम परवानगी प्रकरणास परवानगी देणे बंद आहे. परंतू या पुर्वी मनपाके मार्फत देण्यात आलेल्या बांधकाम परवानगी प्रकरणात रेन वॉटर हारवेस्टींगची करण्याची अट टाकुन परवारणी निर्गमित करण्यात येते.

**सभापती** रेन वॉटर हारवेस्टींगसाठी लागणा-या पाईपचा खर्च अत्यंत कमी येत असतो. सध्या पाण्याची टंचाई असल्यामुळे सर्व इमारत बांधकाम करणा-या मालकास रेन वॉटर हारवेस्टींगचे महत्व सांगीतले पाहिजे मनपा ही रेन वॉटर हारवेस्टींगसाठी अनामत रक्कम जमा करुन घेते तर अशा वेळी ते करुन घेण्याची जबाबदारी मनपाची आहे.

**उमेश चव्हाण** पाण्याची या वर्षीची टंचाई लक्षात घेता घर बांधकाम करणा-या मालकास रेन वॉटर हारवेस्टींग करुन घेण्याचे बंधन करावे. पाणी आडवा पाणी जिरवा या म्हणीप्रमाणे सर्वानी रेन वॉटर हारवेस्टींग केली पाहीजे. प्रत्येकाने पाणीची बचत केली पाहीजे. पाणी बचतीच्या संदर्भातील महानगरपालिकेने पोस्टर, बॅनर, मोठया होर्डीग शहरात मुख्य ठिकाणी लावाव्यात व जन जागृती करावी.

**सभापती** रेन वॉटर हारवेस्टींगचे महत्व नागरीकांना पटवुन देण्याकरीता शहरातील मुख्य रहदारीच्या ठिकाणी जाहीरात करावी. महानगरपालिकेकडून पोस्टर, बॅनर, मोठया होर्डीग शहरातील दर्शणी ठिकाणी लावण्यात याव्यात व जन जागृती करावी. प्रत्येकाने पुनरभरण करुन घ्यावे.

**उप आयुक्त** बांधकाम परवानगी निर्गमित करते वेळी रेन वॉटर हारवेस्टींगची अट टाकलेली आहे. परंतू प्रत्येक्षात बहुतांश नागरीक हे रेन वॉटर हारवेस्टींग करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे. प्रत्येक मालमत्ताधारकांकडून आपण किमान पाच हजार रुपये अनामत घेत असतो. सदरील रक्कम संबधीताची असल्यामुळे त्यांना परत करणे गरजचे आहे. बांधकाम करणारे नागरीक ही अनामत रक्कम परत मागणी करीत नाहीत. मनपाकेत रेन वॉटर हारवेस्टींगची अनामत रक्कम जमा आहे.

संबधीत मालमत्ता धारकाने रेन वॉटर हारवेस्टींग करुन घेतले नाही म्हणुन मनपाने संबधीतास नोटीसा दिल्या पाहिजे, डीसी रुलमध्ये त्यांना रुपये 1000/- दंड लावण्याची तरतूद आहे. महासभेने पारित केलेल्या ठरावात काय तरतूद आहे याची देखील पहाणे आवश्यक आहे. नगररचना विभाग हा रेन वॉटर हारवेस्टींग करुन घेण्यासाठी आस्थेने काम केले पाहिजे तसे होताना दिसत नाही, नगररचना विभागाने योग्य पध्दतीने मॉनिटरींग केले पाहीजे. या विभागाने या बाबीकडे लक्ष दिलेले दिसुन येत नाही. आता वेळ आली आहे पाणी बचत करण्याची त्याकरीता सर्वांनी बांधकाम करीत असताना रेन वॉटर हारवेस्टींग करणे बंधककारक केले पाहिजे. केवळ अट टाकुन होणार नाही.

**संजय मोरे** रेन वॉटर हारवेस्टींगचे पैसे महानगरपालिकेत जमा आहेत. ते पैश्याचे काय करणार आहात.

**उप आयुक्त** बांधकाम परवानगी प्रकरणे सादर केले त्या मालमता धारकांचे पैसे मनपाकडे जमा आहेत. त्यांनी बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र दाखल केले तर त्यांचे पैसे परत करण्याची कायदयात तदतूद आहे. नागरीकांनी रेन वॉटर हारवेस्टींग करुन घेतले अशा परिस्थितीत त्यांना त्यांची जमा असलेली रक्कम परत करता येईल.

**उमेश चव्हाण** नागरीकांनी अनामत रक्कम मनपाकेत जमा केली असल्याने त्या पैश्यावर त्यांचा अधिकार आहे ते पैसे त्यांना परत केले पाहिजे. ज्यांनी रेन वॉटर हारवेस्टींग केले आहे त्यांचे कामाची स्थळ पाहणी करुन ते पैसे परत करावे.

**सभापती** शहरात मोठया प्रमाणात बांधकामे होत आहेत त्या मालमत्ता धारकांस बांधकाम परवानगी निर्गमित करीत असतांना घरावर रेन वॉटर हारवेस्टींगची अट टाकुन देण्यात यावी आणि संबधीतांने रेन वॉटर हारवेस्टींग केले आहे याची खात्री नगररचना विभागाने करावी, नियमाप्रमाणे त्यांच्याकडून रेन वाटर हारवेस्टींगची रक्कम घेण्यात येण्यात यावी. नियमातील तरतूदीनुसार त्यांने पुर्णत्वाचा दाखला सादर केल्यानंतर ही रक्कम त्यांना परत करण्यात यावी.

**विनय गुर्रम** शहरात सध्या पाण्याची टंचाई असल्याने माझ्या प्रभागात तीन दिवस आड पाणी येते आणि हे पाणी सर्व नागरीकांना मिळत सुध्दा नाही. पाणी भरण्याच्या वेळा देखील योग्य नाही रात्री बे रात्री पाणी येते त्यामुळे नागरीकांना पाणी मिळत नाही.

**उमेश चव्हाण** पाण्याची टंचाई आहे ही वस्तूस्थिती आहे. पण पाण्याचे राजकारण करु नये. इतर शहरातच्या तुलनेत आपल्या शहरात पाणी मिळत तरी आहे.

**विनय गुर्रम** पाण्याचे राजकारण करीत नाही माझ्या प्रभागात मध्यरात्री पाणी येत ही बाब मी निर्दशनात आणुन देत आहे.

**सभापती** पाण्यासाठी कोणीही राजकारण करु नये, पाण्याचे योग्य वेळापत्रक तयार करावे व सर्व नागरीकांना पाणी कसे मिळाले पाहीजे याची काळजी प्रशासनाने घ्यावी.

**कार्यकारी अभियंता पापु** विष्णुपूरी जलाशयातील पाणी डेड वॉटर लेवलवर गेले आहे. सर्व रोझ बंद पडलेले आहेत. जॅकवेलमध्ये पाणी घेण्यासाठी पम्प उपयोगात आणावे लागत आहेत. त्यामुळे भविष्यात सर्व शहराला पाणी पुरवठा करावयाचा झाल्यास पाच दिवस आड पाणी देण्याचे विचारा करावा लागणार आहे. पाण्याच्या टाक्यावर लोंकाचा मॉब जमा होत आहे. कर्मचा-यांच्या अंगावर लोक येत आहेत. पाण्याची गंभीर समस्या निर्माण होत आहे तथापी नागरीकांना पाणी कसे देता येईल यासाठी प्रशासनामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. पाणी सोडण्याचे वेळापत्रक कोडमलेले आहे कारण पाण्याच्या टाक्या भरत नाहीत. त्यामुळे वेळवर पाणी सोडणे शक्य होत नाही. सिडको व चौवफाएरीयाला विष्णुपुरीच्या साईट करुन पाणी पुरवठा केला जातो. टाक्याच भरत नसतील तर पाणी हे कमी दाबाने नागरीकांना जात आहे. शेवटच्या लोकांना पाणी मिळत नाही ही बाब सत्य आहे त्या लोकांना पाण्याचे टॅंकर देण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

**विनय गुर्रम** लोक आमच्या घरी येत आहेत पाणी आले म्हणुन त्यासाठी पाणी सोडण्यासाठी योग्य नियोजन होणे अंत्यत गरजेचे आहे. आम्ही अधिका-यांना फोन लावतो तर अधिकारी आमचा फोन घेत नाहीत. आम्ही नागरीकांना काय उत्तर दयावे. आमच्या वार्डात 15000 लोकांना आम्हाला सामोरे जावे लागते. बोंधनकर हे फोन उचलत नाहीत. नागरीकांचा रोष आमच्यावर आहे. लोक आम्हाला विचारतात की पाणी कॆंव्हा येणार आहे आम्ही त्यांना उत्तर देवू शकत नाही. त्यासाठी पाणी सोडण्यासाठी कार्यरत असलेल्या कर्मचा-याचे फोन नंबर जाहीर करावे. त्यामुळे लोक आम्हाला फोन करणार नाहीत.

**सभापती** पाणी सोडण्याच्या वेळा ठरवून नागरीकांना दिलासा दयावा. वेळापत्रक ठरविल्यास त्या वेळामध्ये नागरीक पाणी भरु शकतील. नगरसेवकांना फोन येतात त्यामुळे पाणी उशीरा सोडण्यात येत असेल तर किमान त्या एरीयातील नगरसेवकांना माहिती देण्यात यावी. सर्व अधिकारी वर्गाने आपले फोन चालू ठेवावे. फोन कोणाचाही असो अधिका-यांने फोन घेतला पाहीजे.

**संजय मोरे** — रहीमपुर मध्ये पाण्याची पाईप टाकण्यासाठी मी वांरवार सांगत आहे परंतू पाण्याची लाईन टाकण्यात येत नाही. या एरीयातील लोकांना पाण्याची गंभीर समस्या आहे. लोकांना पाणी पीण्यासाठी नाही त्यासाठी पाण्याची पाईप लाईन टाकून दयावी.

**सभापती** — श्री मोरे यांच्या प्रभागातील रहीमपुर एरीयामध्ये पाण्याची पाईप लाईन टाकून दयावी.

**उमेश चव्हाण** — श्रावस्ती नगर, या भागात जेसीबी नसल्याने नाले साफसफाई मागील 15 दिवसापासुन बंद आहे. पावसाळा आल्यावर या एरीयामध्ये पाणी मोठयाप्रमाणात साचून राहते साठी नाल्याची सफाई करणे गरजचे आहे.

**उप अभियंता (यां)** — जेसीबीच्या सहाय्याने नाले सफाईचे काम सुरु करण्यात आलेले होते. परंतू रेल्वेच्या फोनची केबल काम करीत असतांना जेसीबीने तुटली त्यामुळे संबधीत कंत्राटदारवर पोलीसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्यामुळे जेसीबी मशीनची जप्ती करण्यात आली. त्यामुळे नाले सफाईचे काम बंद आहे.

**उमेश चव्हाण** — जेसीबी जप्त करीत असतांना आपले मनपाचे अधिकारी त्या ठिकाणी नव्हते त्यामुळे मशीनची जप्ती झाली आहे. आपले अधिकारी त्या ठिकाणावर असते तर जेसीबी मशीनची जप्ती टळली असती.

**उप अभियंता (यां)** — जेसीबी मशीन जप्तीबाबतचे प्रकरणे औरंगाबाद न्यायालयात चालू आहे. त्यामुळे किती वेळ लागेल सांगणे कठीण आहे.

**उप आयुक्त** — आपण नाले सफाई करण्यासाठी कंत्राटदाराची मशीन आहे. कंत्राटदार पार्टी आहे. कंत्राटदारास रुपये 1.50 लक्ष रुपये दंड आकारण्यात आला होता. तो दंड कंत्राटदार भरण्यास तयार देखील आहे परंतू या प्रकरणात गुन्हा नोंद झालेला आहे. त्यामुळे मशिन सोडण्यासाठी वेळ लागू शकतो.

**उमेश चव्हाण** — दुसरी जेसीबी मशीन लावून नाले सफाई करण्यात यावी. एका मशीवर आपण अंवलबून राहू शकत नाही.

**विनय गुर्रम** — आपल्या मनपाची मशीन बंद आहे ती चालू नाही. मग नाले सफाईचे कामे कशी पुर्ण होतील.

**संजय मोरे** — पाण्याच्या कामासाठी आपण एएमआरसी लावलेली आहे ती काम करीत नाही मार्च महीण्यापासुन माझ्या प्रभागातील कामासाठी 2 पाईप टाकण्यासाठी कार्यकारी अभियंता यांना सांगीतले होते परंतू आतापर्यंत पाईप टाकुन दिलेले नाही.

**सभापती** — एएमआरसीची दोन पाईप टाकण्यासाठी काय अडचण आहे. दोन पाईप टाकल्याने त्यांचा प्रश्न सुटत असेल तर श्री मोरे यांच्या प्रभागातील काम कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी करुन दयावे. श्री गुर्रम यांचेही जे कामे आहेत ती कामे देखील करुन देण्यात यावे.

**विनय गुर्रम** — माझा एक विषय आहे. पार्श्व असोसियट नागपुरचे तुरटीचे देयक देण्यासाठीचा विषय आहे. या एजन्सीला बिल देण्यात येवू नये. त्याचे बील कसे तयार केले आहे. बील हे लेखा विभागास कसे पाठविले आहे.

**कार्यकारी अभियंता पापु** — आम्ही अहवाल तयार केला आहे. तुरटीचे पेमेंट केलेले नाही.

**विनय गुर्रम** — आम्ही पत्र दिल्यामुळे बील थांबवले आहे नाहीतर बीलाची अदाई केली गेली असती. दुषीत पाण्यामुळे मागे नगरपालिका कालावधीमध्ये एसीबीची चौकशी सुरु झाली होती. तुरटीचा योग्य दर्जा आपणास प्राप्त झाला नाही तर तो लोकांच्या आरोग्याशी संबधीत मुददा तयार होतो. बी ग्रेडची तुरटी पुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे नविन निवीदा प्रक्रीया करुन चांगल्या दर्जाची तुरटीची तात्काळ खरेदी करावी. शहराला दुषीत पाणी पुरवठा होणार नाही याची काळजी प्रशासनाने घेतली पाहीजे.

**संजय मोरे** — बिल पाठविण्याची काय गरज होती. कारण बिल काढावयाचे होते म्हणुनच बिल पाठविले आहे.

**सभापती** — उप समितीचा तुरटीच्या संदर्भातील अहवाल प्राप्त झालेला आहे. त्या अहवालाच तपासणी करुन 15 दिवसाचे आत अहवाल सादर करावा. आणि तो अहवाल स्थायी समिती समोर आणावा. मुख्यलेखाधिकारी यांनी बिल अदाई करण्यात येवू नये.

**उमेश चव्हाण** — विषय पत्रीका पास करण्यात येते. व सर्व अधिकार हे सभापती स्थायी समिती यांना देण्यात येतात.

## विषय क्रं.०१

दिनांक ०२.०४.२०१६ रोजी मागील झालेल्या स्थायी समितीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत

**सभापती** — दिनांक ०२.०४.२०१६ रोजी मागील झालेल्या स्थायी समितीच्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.५१** **ठराव**

दिनांक ०२.०४.२०१६ रोजी मागील झालेल्या स्थायी समितीच्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**विषय क्रं.०२**

**नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत दैनंदिन निर्माण होणा-या घनकचरा मौजे तुप्पा येथील डम्पींग ग्राऊन्डवर टाकण्यात येत आहे. सदर ठिकाणी साठवलेल्या कच-यामधुन निघणा-या मिथेन सारख्या ज्वलनशील वायुंमुळे वारंवार आग लागुन सर्व कचरा पेटून आग भडकत असल्याने अग्नीशमन दलाच्या यंत्रणेव्दारे वेळोवेळी वॉटर कुलींग करुन नियंत्रित करण्यात येत आहे.**

दररोज येणारा कच-यास आग लागून परत आग वाढू नये यासाठी त्या कच-यातील प्लॉस्टीक व ज्वलनशील पदार्थ वेगळे केल्यास उर्वरीत कचरा साठवणे शक्य व्हावे म्हणुन खालील प्रमाणे उपाययोजना करणे आवश्यक आहे.

दररोज जमा होणा-या कच-यावर दुर्गंधीनाशक Bio-Culture औषध पंपाव्दारे फवारणी करणे, Tender Attached loader व्दारे पलॉटमार्फवर कचरा पसरवुन Tractor hoe व्दारे मोठे छोटे प्लॉस्टीक व इतर Non Biodegradable पदार्थ वेगळा करणे, उर्वरीत कचरा Window पध्दतीने पसरवुन दररोज रो तयार करणे, पंधरा दिवसानंतर Compost झालेला सदर कचरा एकत्र करणे, इत्यादी सर्व कामासाठी अंदाजित मनुष्यबळ व यंत्रसामुग्री खालील प्रमाणे तातडीने लावणे अत्यंत आवश्यक आहे.

| | तपशील | अंदाजीत किमंत |
|---|---|---|
| १) | २० कामगार (किमान वेतन प्रमाणे) | २,३०,०००/- |
| २) | Tractor or attached loader & hoe | ७५,०००/- |
| ३) | दुर्गंधीनाशक Bio-Culture औषधी फवारणी | १,००,०००/- |
| ४) | इतर किरकोळ खर्च | १०,०००/- |
| | एकूण | ४,१५,०००/- प्रति महा |

**करिता उक्त सर्व प्रकियेस आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामुग्रीसाठी लागणारा एकूण प्रतिमहा खर्च रु. ४,१५,०००/- प्रमाणे एक वर्षाच्या कालावधी करिता रुपये ४९,८०,०००/- च्या तरतुदीस लागणारा रक्कम १४व्या वित्त आयोगातील प्राप्त निधीतुन खर्च करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या परिशिष्ठ ५ मधील प्रकरण ५ मधील २(२) नुसार आर्थीक तरतुदींची मंजुरी करिता प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.**

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते तसेच नविन घनकचरा प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वीत होई पर्यंत या उपाययोजनेच्या कामास व लागणा-या खर्चासही प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.५२** **ठराव**

**नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत दैनंदिन निर्माण होणा-या घनकचरा मौजे तुप्पा येथील डम्पींग ग्राऊन्डवर टाकण्यात येत आहे. सदर ठिकाणी साठवलेल्या कच-यामधुन निघणा-या मिथेन सारख्या ज्वलनशील वायुंमुळे वारंवार आग लागुन सर्व कचरा पेटून आग भडकत असल्याने अग्नीशमन दलाच्या यंत्रणेव्दारे वेळोवेळी वॉटर कुलींग करुन नियंत्रित करण्यात येत आहे.**

दररोज येणारा कच-यास आग लागून परत आग वाढू नये यासाठी त्या कच-यातील प्लॉस्टीक व ज्वलनशील पदार्थ वेगळे केल्यास उर्वरीत कचरा साठवणे शक्य व्हावे म्हणुन खालील प्रमाणे उपाययोजना करणे आवश्यक आहे.

दररोज जमा होणा-या कच-यावर दुर्गंधीनाशक Bio-Culture औषध पंपाव्दारे फवारणी करणे, Tender Attached loader व्दारे पलॉटमार्फवर कचरा पसरवुन Tractor hoe व्दारे मोठे छोटे प्लॉस्टीक व इतर Non Biodegradable पदार्थ वेगळा करणे, उर्वरीत कचरा Window पध्दतीने पसरवुन दररोज रो तयार करणे, पंधरा दिवसानंतर Compost झालेला सदर कचरा एकत्र करणे, इत्यादी सर्व कामासाठी अंदाजित मनुष्यबळ व यंत्रसामुग्री खालील प्रमाणे तातडीने लावणे अत्यंत आवश्यक आहे.

| | तपशील | अंदाजीत किमंत |
|---|---|---|
| १) | २० कामगार (किमान वेतन प्रमाणे) | २,३०,०००/- |
| २) | Tractor or attached loader & hoe | ७५,०००/- |
| ३) | दुर्गंधीनाशक Bio-Culture औषधी फवारणी | १,००,०००/- |
| ४) | इतर किरकोळ खर्च | १०,०००/- |
| | एकूण | ४,१५,०००/- प्रति महा |

**करिता उक्त सर्व प्रकियेस आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामुग्रीसाठी लागणारा एकूण प्रतिमहा खर्च रु. ४,१५,०००/- प्रमाणे एक वर्षाच्या कालावधी करिता रुपये ४९,८०,०००/- च्या तरतुदीस लागणारा रक्कम १४व्या वित्त आयोगातील प्राप्त निधीतुन खर्च करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या परिशिष्ठ ५ मधील प्रकरण ५ मधील २(२) नुसार आर्थीक तरतुदींची मंजुरी तसेच नविन घनकचरा प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वीत होई पर्यंत या उपायोजनेच्या कामास व लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.**

## विषय क्रं.०३

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **जुना मोंढा भागात रंजीतसिंघ मार्केट व बिंदु मंगल कार्यालय** PPP **तत्वावर विकसीत करण्यात येत आहे.** सदर कामाची निवीदा **मे. जयकेदारनाथ बिल्डकॉन प्रा.लि.** यांची मनपा स्थायी समिती सभा ठराव क्रं. ९३ दिनांक १६.०८.२०१२ रोजी मंजुर झालेली असुन कामाचा करारनामा हा दिनांक ३०.११.२०१२ रोजी मंजुर झाला आहे.

विकासकाने दुकान गाळयाचे पुनर्वसन व बिंदु मंगल कार्यालय यासाठी एकूण २९४४ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम मनपास हस्तांरिीत करावयाचे होते. मनपाकेच्या नगररचना विभागाने दिलेल्या दिनांक ०७.०१.२०१६ च्या परवानगीनुसार विकासक यांनी १००६.४२ चौ.मी. वाढीव एक मजला बांधकाम मनपाकेच्या झोन कार्यालयासाठी (क्षेत्रीय कार्यालय क्रं. सी) केलेले आहे सदर वाढीव बांधकाम केलेल्या कामाची किमंत **रु. १.९०,९६,८२०/-** होते असे या कामाचे प्रकल्प सल्लागार Fortress यांनी अहवाल सादर केला आहे. सदरचे काम तातडीने पुर्ण करणे गरजेचे असल्यामुळे आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार रुपये १,९०,९६,८२०/- चे अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

**सदरचे काम प्रगतीत असलेल्या कामा मध्ये अंदाजपत्रक दरावर मे. जयकेदारनाथ बिल्डकॉन पा्र.लि. या कंत्राटदाराकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. १,९०,९६,८२०/- यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर करावा.**

**तसेच सदर कामाचा करानामा रु. ५.९१ कोटी प्रमिनीयम रक्कमेस मंजुर झालेले असुन विकासकाने दरवर्षी २५% रक्कम रुपये १,४७,७५,०००/- इतकी महापालिकेस जमा करावयाची आहे. सदर जमा करावयाच्या रक्कमेतुन वाढीव केलेल्या कामाची रक्कम रु. १,९०,९६,८२०/- इतकी समायोजीत करणेस मानयता देणेसाठी मा. स्थायी समिती सभे समोर सादर.**

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते

**ठराव क्रं.५३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **जुना मोंढा भागात रंजीतसिंघ मार्केट व बिंदु मंगल कार्यालय** PPP **तत्वावर विकसीत करण्यात येत आहे.** सदर कामाची निवीदा **मे. जयकेदारनाथ बिल्डकॉन प्रा.लि.** यांची मनपा स्थायी समिती सभा ठराव क्रं. ९३ दिनांक १६.०८.२०१२ रोजी मंजुर झालेली असुन कामाचा करारनामा हा दिनांक ३०.११.२०१२ रोजी मंजुर झाला आहे.

विकासकाने दुकान गाळयाचे पुनर्वसन व बिंदु मंगल कार्यालय यासाठी एकूण २९४४ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम मनपास हस्तांतरीत करावयाचे होते. मनपाकेच्या नगररचना विभागाने दिलेल्या दिनांक ०७.०१.२०१६ च्या परवानगीनुसार विकासक यांनी १००६.४२ चौ.मी. वाढीव एक मजला बांधकाम मनपाकेच्या झोन कार्यालयासाठी (क्षेत्रीय कार्यालय क्रं. सी) केलेले आहे सदर वाढीव बांधकाम केलेल्या कामाची किमंत **रु. १.९०,९६,८२०/-** होते असे या कामाचे प्रकल्प सल्लागार Fortress यांनी अहवाल सादर केला आहे. सदरचे काम तातडीने पुर्ण करणे गरजेचे असल्यामुळे आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार रुपये १,९०,९६,८२०/- चे अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

**सदरचे काम प्रगतीत असलेल्या कामा मध्ये अंदाजपत्रक दरावर मे. जयकेदारनाथ बिल्डकॉन पा्र.लि. या कंत्राटदाराकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. १,९०,९६,८२०/- यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर करावा.**

**तसेच सदर कामाचा करानामा रु. ५.९१ कोटी प्रमिनीयम रक्कमेस मंजुर झालेले असुन विकासकाने दरवर्षी २५% रक्कम रुपये १,४७,७५,०००/- इतकी महापालिकेस जमा करावयाची आहे. सदर जमा करावयाच्या रक्कमेतुन वाढीव केलेल्या कामाची रक्कम रु. १,९०,९६,८२०/- इतकी समायोजीत करण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मानयता देते.**

## विषय क्रं.०४

**स्थानिक संसथा कर प्राधाली (रु. ५० कोटी पेक्षा जास्त व्यवसाय असलेल्या वयवसायीक वगळुन) दिनांक ०१.०८.२०१५ पासुन शासनाने बंद केली असुन व्प्यवसायीकांना स्थानिक संस्था कर भरणे सुलभ व्हावे या करिता स्थानिक संस्था कर अभय योजना शासनाने घोषीत केली होती. या अभय योजनेत अनेक व्यवसायीकांनी स्थानिक संस्था कराचा भरणा करुन निर्धारणा करिता वार्षिक विवरणपत्र दाखल केली आहेत. त्यानुसार निर्धारणाचे काम चालु असुन सदर निर्धारण दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत पुर्ण करणे बंधनकारक आहे.**

परंतु सदर कामाचे सॉफ्टवेअर (फाउन्टनहेड इनफोसोल्युशन प्रा.लि. वाशी नवि मुंबई) दिनांक ०१.०४.२०१६ पासुन बंद होते. त्यामुळे सदर सॉफ्टवेअरचे व्यवस्थापक श्री शिरीष बोंद्रे व श्री संजय घाडगे यांना भ्रमणध्वसनी वरुन संपर्क साधुन सॉफ्टवेअर चालु करण्या बाबत सुचना देण्यात आल्या असता, त्यांनी सदर सॉफ्टवेअर वार्षिक देखभालीचा खर्च देण्यात आलेला नाही असे सांगुन तुर्त सॉफ्टवेअर तात्पुरते चालु करुन दिले आहे व **सालसन २०१२-१३ ते २०१५-१६ या चार वर्षा करिताचे प्रतिवर्ष रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) प्रमाणे रुपये ८,००,०००/- लाखचे देयक दाखल केले आहे.**

सदर सॉफ्टवेअर कंपनीस कार्यारंभ आदेश दिल्यानंतर एक वर्षा पर्यंत कंपनीकडून विनामुल्य (Annual Technical Support) सेवा पुरविण्यात येईल असे अटी / शर्ती मध्ये नमुद आहे. संबंधीतास आदेश क्रं. स्थासक/२९८९/१० दिनां २६.११.२०१९ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. स्थानिक संस्था कर अभय योजनेत प्राप्त झालेल्या वार्षिक विवरण पत्राच्या निर्धारणाचे काम एका वर्षाच्या आत म्हणजे दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत पुर्ण करणे बंधनकारक आहे सदर कामाची तातडी लक्षात घेऊन संबंधीत

फाउंन्टनहेड इन्फोसोल्युशन प्रा.लि वाशी, नवि मुंबई यांना सालसन २०१५-१६ या एक वर्षाचा रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख केवळ) वार्षिक देखभाल खर्च देण्यास मान्यतेस्तव सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते

**ठराव क्रं.५४** **ठराव**

**स्थानिक संसथा कर प्राधाली (रु. ५० कोटी पेक्षा जास्त व्यवसाय असलेल्या वयवसायीक वगळुन) दिनांक ०१.०८.२०१५ पासुन शासनाने बंद केली असुन व्यव्यवसायीकांना स्थानिक संस्था कर भरणे सुलभ व्हावे या करिता स्थानिक संस्था कर अभय योजना शासनाने घोषीत केली होती. या अभय योजनेत अनेक व्यवसायीकांनी स्थानिक संस्था कराचा भरणा करुन निर्धारणा करिता वार्षिक विवरणपत्र दाखल केली आहेत. त्यानुसार निर्धारणाचे काम चालु असुन सदर निर्धारण दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत पुर्ण करणे बंधनकारक आहे.**

परंतु सदर कामाचे सॉफ्टवेअर (फाउन्टनहेड इनफोसोल्युशन प्रा.लि. वाशी नवि मुंबई) दिनांक ०१.०४.२०१६ पासुन बंद होते. त्यामुळे सदर सॉफ्टवेअरचे व्यवस्थापक श्री शिरीष बोंद्रे व श्री संजय घाडगे यांना भ्रमणध्वसनी वरुन संपर्क साधुन सॉफ्टवेअर चालु करण्या बाबत सुचना देण्यात आल्या असता, त्यांनी सदर सॉफ्टवेअर वार्षिक देखभालीचा खर्च देण्यात आलेला नाही असे सांगुन तुर्त सॉफ्टवेअर तात्पुरते चालु करुन दिले आहे व **सालसन २०१२-१३ ते २०१५-१६ या चार वर्षा करिताचे प्रतिवर्ष रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) प्रमाणे रुपये ८,००,०००/- लाखचे देयक दाखल केले आहे.**

सदर सॉफ्टवेअर कंपनीस कार्यारंभ आदेश दिल्यानंतर एक वर्षा पर्यंत कंपनीकडून विनामुल्य (Annual Technical Support) सेवा पुरविण्यात येईल असे अटी / शर्ती मध्ये नमुद आहे. संबंधीतास आदेश क्रं. स्थासक/२९८९/१० दिनां २६.११.२०१९ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. स्थानिक संस्था कर अभय योजनेत प्राप्त झालेल्या वार्षिक विवरण पत्राच्या निर्धारणाचे काम एका वर्षाच्या आत म्हणजे दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत पुर्ण करणे बंधनकारक आहे सदर कामाची तातडी लक्षात घेऊन संबंधीत फाउंन्टनहेड इन्फोसोल्युशन प्रा.लि वाशी, नवि मुंबई यांना सालसन २०१५-१६ या एक वर्षाचा रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख केवळ) वार्षिक देखभाल खर्च देण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

## विषय क्रं.०५

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत येणारे प्रमुख रस्ते वेळोवेळी दुरुस्त करणे व डागडुजी करणे जेणे करुन सदर क्षेत्रामधील शहरातील रस्त्यावरील वाहतुक सुरळीत होवुन भविष्यात कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही. मनपा मालकीच्या इमारतीची किरकोळ दुरुस्ती करुन घेणे तसेच दरवर्षी साजरे होणारे सण, उत्सव, जयंती, पुध्यतिथी VIP दौरे, गणेश उत्सव, दुर्गादेवी, रमजान ईद, दसरा, दिवाळी, होळी ई. निमित्त दरवर्षी लागणारी कामे सालसन २०११-१२ पासुन क्षेत्र निहाय कंत्राटदार नेमुण वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्र अ अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत लागणारा रुपये ५५,११,०००/-** खर्चाची प्रशासकिय आर्थीक मान्यता प्रदान झाल्यानुसार निविदा सुचना क्रं. ३०९/२०१६ दिनांक ०६.०४.२०१६ अन्वये दैनिक उदयाचा मराठवाडा / दैनिक दिव्य मराठी या वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

क्षेत्र अ अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या असुन प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समिती समोर दिनांक २३.०५.२०१६ रोजी उघडण्यात आले असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| ०१ | **श्री साई कन्सट्रक्शन नांदेड** | **४.१% कमी दराने** |
| ०२ | ग्लोबल इंटरप्रायजेस नांदेड | २.१% कमी दराने |
| ०३ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | ५% जास्त दराने |
| ०४ | श्रध्दा इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजिनिअर कंपनी | ७% जास्त दराने |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा **श्री साई कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रक दरापेक्षा ४.१% कमी दराची आहे.**

करिता **क्षेत्र अ अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती ची कामे करणेसाठी श्री साई कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ४.१% कमी दराची निविदा मंजुरीस्तव व लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठीचा** प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेला निविदा मंजुरीचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.५५** **ठराव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत येणारे प्रमुख रस्ते वेळोवेळी दुरुस्त करणे व डागडुजी करणे जेणे करुन सदर क्षेत्रामधील शहरातील रस्त्यावरील वाहतुक सुरळीत होवुन भविष्यात कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही. मनपा मालकीच्या इमारतीची किरकोळ दुरुस्ती करुन घेणे तसेच दरवर्षी साजरे होणारे सण, उत्सव, जयंती, पुध्यतिथी VIP दौरे, गणेश उत्सव, दुर्गादेवी, रमजान ईद, दसरा, दिवाळी, होळी ई. निमित्त दरवर्षी लागणारी कामे सालसन २०११-१२ पासुन क्षेत्र निहाय कंत्राटदार नेमुण वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्र अ अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत लागणारा रुपये ५५,११,०००/-** खर्चाची प्रशासकिय आर्थीक मान्यता प्रदान झाल्यानुसार निविदा सुचना क्रं. ३०९/२०१६ दिनांक ०६.०४.२०१६ अन्वये दैनिक उदयाचा मराठवाडा / दैनिक दिव्य मराठी या वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

क्षेत्र अ अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या असुन प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समिती समोर दिनांक २३.०५.२०१६ रोजी उघडण्यात आले असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| **०१** | **श्री साई कन्सट्रक्शन नांदेड** | **४.१% कमी दराने** |
| ०२ | ग्लोबल इंटरप्रायजेस नांदेड | २.१% कमी दराने |
| ०३ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | ५% जास्त दराने |
| ०४ | श्रध्दा इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजिनिअर कंपनी | ७% जास्त दराने |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा **श्री साई कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रक दरापेक्षा ४.१% कमी दराची आहे.**

करिता **क्षेत्र अ अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती ची कामे करणेसाठी श्री साई कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ४.१% कमी दराची निविदा मंजुरीस्तव व लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.**

## विषय क्रं.०६

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत येणारे प्रमुख रस्ते वेळोवेळी दुरुस्त करणे व डागडुजी करणे जेणे करुन सदर क्षेत्रामधील शहरातील रस्त्यावरील वाहतुक सुरळीत होवुन भविष्यात कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही. मनपा मालकीच्या इमारतीची किरकोळ दुरुस्ती करुन घेणे तसेच दरवर्षी साजरे होणारे सण, उत्सव, जयंती, पुध्यतिथी VIP दौरे, गणेश उत्सव, दुर्गादेवी, रमजान ईद, दसरा, दिवाळी, होळी ई. निमित्त दरवर्षी लागणारी कामे सालसन २०११-१२ पासुन क्षेत्र निहाय कंत्राटदार नेमुण वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्र ब अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत लागणारा रुपये ८०,६८,०००/-** खर्चाची प्रशासकिय आर्थीक मान्यता प्रदान झाल्यानुसार निविदा सुचना क्रं. ३०९/२०१६ दिनांक ०६.०४.२०१६ अन्वये दैनिक उदयाचा मराठवाडा / दैनिक दिव्य मराठी या वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

क्षेत्र **ब** अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या असुन प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समिती समोर दिनांक २३.०५.२०१६ रोजी उघडण्यात आले असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| **०१** | **श्रध्दा इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजिनिअर कंपनी** | **०.२८% कमी दराने** |
| ०२ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | २.५% जास्त दराने |
| ०३ | श्री साई कन्सट्रक्शन नांदेड | ८% जास्त दराने |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा **श्रध्दा इलेक्ट्रीक्ल्स ॲन्ड इंजिनिअर कंपनी नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रक दरापेक्षा ०.२८% कमी दराची आहे.**

करिता **क्षेत्र ब अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती ची कामे करणेसाठी श्रध्दा इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजिनिअर कंपनी नांदेड यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ०.२८% कमी दराची निविदा मंजुरीस्तव व लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठीचा** प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेला निविदा मंजुरीचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.५६** **ठराव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत येणारे प्रमुख रस्ते वेळोवेळी दुरुस्त करणे व डागडुजी करणे जेणे करुन सदर क्षेत्रामधील शहरातील रस्त्यावरील वाहतुक सुरळीत होवुन भविष्यात कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही. मनपा मालकीच्या इमारतीची किरकोळ दुरुस्ती करुन घेणे तसेच दरवर्षी साजरे होणारे सण, उत्सव, जयंती, पुध्यतिथी VIP दौरे, गणेश उत्सव, दुर्गादेवी, रमजान ईद, दसरा, दिवाळी, होळी ई. निमित्त दरवर्षी लागणारी कामे सालसन २०११-१२ पासुन क्षेत्र निहाय कंत्राटदार नेमुण वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्र ब अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत लागणारा रुपये ८०,६८,०००/-** खर्चाची प्रशासकिय आर्थीक मान्यता प्रदान झाल्यानुसार निविदा सुचना क्रं. ३०९/२०१६ दिनांक ०६.०४.२०१६ अन्वये दैनिक उदयाचा मराठवाडा / दैनिक दिव्य मराठी या वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

क्षेत्र **ब** अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या असुन प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समिती समोर दिनांक २३.०५.२०१६ रोजी उघडण्यात आले असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| **०१** | **श्रध्दा इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजिनिअर कंपनी** | **०.२८% कमी दराने** |
| ०२ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | २.५% जास्त दराने |
| ०३ | श्री साई कन्सट्रक्शन नांदेड | ८% जास्त दराने |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा **श्रध्दा इलेक्ट्रीक्ल्स ॲन्ड इंजिनिअर कंपनी नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रक दरापेक्षा ०.२८% कमी दराची आहे.**

करिता **क्षेत्र ब अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती ची कामे करणेसाठी श्रध्दा इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजिनिअर कंपनी नांदेड यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ०.२८% कमी दराची निविदा मंजुरीस्तव व लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.**

## विषय क्रं.०७

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत येणारे प्रमुख रस्ते वेळोवेळी दुरुस्त करणे व डागडुजी करणे जेणे करुन सदर क्षेत्रामधील शहरातील रस्त्यावरील वाहतुक सुरळीत होवुन भविष्यात कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही. मनपा मालकीच्या इमारतीची किरकोळ दुरुस्ती करुन घेणे तसेच दरवर्षी साजरे होणारे सण, उत्सव, जयंती, पुध्यतिथी VIP दौरे, गणेश उत्सव, दुर्गादेवी, रमजान ईद, दसरा, दिवाळी, होळी ई. निमित्त दरवर्षी लागणारी कामे सालसन २०११-१२ पासुन क्षेत्र निहाय कंत्राटदार नेमुण वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्र ड अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत लागणारा रुपये ६२,५६,०००/-** खर्चाची प्रशासकिय आर्थीक मान्यता प्रदान झाल्यानुसार निविदा सुचना क्रं. ३०९/२०१६ दिनांक ०६.०४.२०१६ अन्वये दैनिक उदयाचा मराठवाडा / दैनिक दिव्य मराठी या वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

क्षेत्र **ड** अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या असुन प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समिती समोर दिनांक २३.०५.२०१६ रोजी उघडण्यात आले असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| **०१** | **कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड** | **५% कमी दराने** |
| ०२ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | ३.२८% कमी दराने |
| ०३ | श्री साई कन्सट्रक्शन नांदेड | ५% जास्त दराने |
| ०४ | श्रध्दा इलेक्ट्रीकल अन्ड इंजिनिअर कंपनी नांदेड | ७% जास्त दराने |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा **कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रक दरापेक्षा ५% कमी दराची आहे.**

करिता **क्षेत्र ड अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती ची कामे करणेसाठी कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ५% कमी दराची निविदा मंजुरीस्तव व लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठीचा** प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेला निविदा मंजुरीचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.५७** **ठराव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत येणारे प्रमुख रस्ते वेळोवेळी दुरुस्त करणे व डागडुजी करणे जेणे करुन सदर क्षेत्रामधील शहरातील रस्त्यावरील वाहतुक सुरळीत होवुन भविष्यात कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही. मनपा मालकीच्या इमारतीची किरकोळ दुरुस्ती करुन घेणे तसेच दरवर्षी साजरे होणारे सण, उत्सव, जयंती, पुध्यतिथी VIP दौरे, गणेश उत्सव, दुर्गादेवी, रमजान ईद, दसरा, दिवाळी, होळी ई. निमित्त दरवर्षी लागणारी कामे सालसन २०११-१२ पासुन क्षेत्र निहाय कंत्राटदार नेमुण वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्र ड अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत लागणारा रुपये ६२,५६,०००/-** खर्चाची प्रशासकिय आर्थीक मान्यता प्रदान झाल्यानुसार निविदा सुचना क्रं. ३०९/२०१६ दिनांक ०६.०४.२०१६ अन्वये दैनिक उदयाचा मराठवाडा / दैनिक दिव्य मराठी या वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

क्षेत्र **ड** अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या असुन प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समिती समोर दिनांक २३.०५.२०१६ रोजी उघडण्यात आले असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| **०१** | **कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड** | **५% कमी दराने** |
| ०२ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | ३.२८% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ०३ | श्री साई कन्सट्रक्शन नांदेड | ५% जास्त दराने |
| ०४ | श्रध्दा इलेक्ट्रीकल अन्ड इंजिनिअर कंपनी नांदेड | ७% जास्त दराने |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा **कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रक दरापेक्षा ५% कमी दराची आहे.**

करिता **क्षेत्र ड अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती ची कामे करणेसाठी कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ५% कमी दराची निविदा मंजुरीस्तव व लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.**

## विषय क्रं.०८

**महाराष्ट्र दिनाचा ५६ वा वर्धापन दिन समारंभ मुख्य शासकीय ध्वजारोहनाचा कार्यक्रम दिनांक ०१.०५.२०१६ रोजी पोलीस मुख्यालय कवायत मैदान गोवर्धन घाट रोड नांदेड येथे साजरा करण्यात आला** असुन सदर ठिकाणी कार्यक्रमा करिता व अतिमहत्वाच्या व्यक्ती करिता आसन व्यवस्था जसे मंडप, वॉटर प्रुफ, साईडींग, ग्रीन व रेड कार्पेट, चटई, सोफासेट चेअर टिपॉय इत्यादीची व्यवस्था **श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड** यांचे मार्फत करुन सदर कामाचे **रुपये ३,२३,०५४/-** चे देयक दाखल केले आहे.

करिता वरील प्रमाणे रुपये ३,२३,०५४/- च्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मान्यता देणे करिता सदरचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या कार्योत्तर प्रशासकिय आर्थीक मंजुरीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येतो.

**ठराव क्रं.५८** **ठराव**

**महाराष्ट्र दिनाचा ५६ वा वर्धापन दिन समारंभ मुख्य शासकीय ध्वजारोहनाचा कार्यक्रम दिनांक ०१.०५.२०१६ रोजी पोलीस मुख्यालय कवायत मैदान गोवर्धन घाट रोड नांदेड येथे साजरा करण्यात आला** असुन सदर ठिकाणी कार्यक्रमा करिता व अतिमहत्वाच्या व्यक्ती करिता आसन व्यवस्था जसे मंडप, वॉटर प्रुफ, साईडींग, ग्रीन व रेड कार्पेट, चटई, सोफासेट चेअर टिपॉय इत्यादीची व्यवस्था **श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड** यांचे मार्फत करुन सदर कामाचे **रुपये ३,२३,०५४/-** चे देयक दाखल केले आहे.

करिता वरील प्रमाणे रुपये ३,२३,०५४/- च्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मान्यता हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

## विषय क्रं.०९ अपिल

प्रति, दिनांक ०२.०४.२०१६

**मा. सभापती साहेब,**
स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

**प्रकरण** :- महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) मधील तरतुदीनुसार अपिल

मा. सभापती महोदयाचे न्यायालयात मी कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/आस्था-१/१४६७८ दिनांक ०८.०२.२००७ चे आदेशा विरुध्द अपिल करीत आहे.

मा. महोदय उक्त आदेशा विरुध्द अपिल करण्यास मला विलंब झाला आहे माझे शिक्षण अगदीच तोडके आहे मला कायद्याची जान नाही. मला कांही कारण नसतांना निलंबीत केले म्हणुन माझी मानसिक अवस्था बिघडली होती. त्यामुळे विहित मुदतीत मी आपल्या न्यायालयात अपिल दाखल करु शकलो नाही त्यामुळे मला क्षमा करुन विलंब क्षमपित करुन माझे अपिल मान्य करावे ही विनंती.

मा. महोदय माझी नियुक्ती भुतपूर्व नांदेड नगरपालिका कार्यालयात दिनांक ०१.०४.१९८३ रोजी शिपायी या पदावर करण्यात आली मला मनपा कार्यालयाने कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/आस्था-६/३७४२/ दिनांक २१.०६.२००६ अन्वये निलंबीत करुन माझ्यावर ज्ञापन, जोडपत्र १ ते ४ दिनांक ०४.१०.२००६ रोजी बजावले, जोडपत्र एक मध्ये माझ्यावर (१) कामात निष्काळजीपणा करणे (२) नेमुण दिलेल्या कर्तव्यात कसुर करणे असे दोन दोषारोपठेवण्यात आले. विहित मुदतीत दिनांक ११.१०.२००६ रोजी मी माझ्यावर ठेवण्यात आलेले आरोप नाकबुल करुन तसे कार्यालयास कळविले. सदर स्पष्टीकरणात मी असे नमुद केले आहे की, चौकशी अधिकारी समोर मी माझ्यावर ठेवण्यात आलेले दोषारोपाचे उत्तर देईन याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, माझ्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप मी स्पष्टपणे नाकरले होते.

मा. महोदय महाराष्ट्र नागरी शिस्त अपिल १९७१ मधील तरतुदीनुसार अपचारी कर्मचारी यांनी त्यांचेवर लादलेले दोषारोप नाकरले असतील तर चौकशी अधिकारी यांची नेमणुक करुन विभागीय चौकशी करुन विभागीय चौकशी अंती लादलेले दोष सिध्द झाले तर शिक्षा देण्याची तरतुद आहे. तथापी प्रस्तुत प्रकरणात विभागीय चौकशी न करता माझा निलंबन काळ मी कामावर रुजु तारखे पर्यंत निलंबन काळ गृहीत धरुन माझी एक वार्षीक वेतनवाढ कायदेशीर कायम स्वरुपी बंद करुन माझ्यावर घोर अन्याय केला आहे. माझे कधीही न भरुन निघणारे आर्थीक नुकसान केले आहे.

मा. महोदय महाराष्ट्र नागरी शिस्त अपिल १९७९ मधील तरतुदीनुसार स्थायी समितीचे पुर्व मान्यतेने शिवाय कोणत्याही कर्मचा-यांची वार्षीक वेतनवाढ कायम सवरुपी बंद करता येत नाही. अशी नियमात तरतुद असतांना देखील स्थायी समितीची मान्यता न घेता बेकायदेशीररित्या माझी एक वार्षीक वेतनवाढ कायम स्वरुपी बंद करुन माझ्यावर कठोर अन्याय केला आहे.

मा. महोदय माझा निलंबन कालावधी कर्तव्य काळ करुन बंद करण्यात आलेली वार्षीक वेतनवाढ पुर्ववत चालु करणे संबंधी मी अनेक वेळा मा. आयुक्त यांना विनंती अर्ज केले तथापी एकही अर्जाचा आजपावेतो विचार केला नाही.

**विनंती**

मा. महोदयांना विनंती करण्यात येते की मला अपिल करणेस झालेला विलंब क्षमापीत करुन अपिल मान्य करावे तसेच निलंबन, बडतर्फी, सेवेतुन काढून टाकणे व त्या काळातील प्रदाने १९८२ चे नियम ८१ व ८२ चे तरतुदीनुसार माझा निलंबन कालावधी कर्तव्य काळ गृहीत धरुन मला त्या काळातील वेतन ध्यावे माझी एक वार्षीक वेतनवाढ कायम स्वरुपी बंद केलेली पुर्ववत चालु करावी अशी विनंती आहे.

**अपिलार्थी**
**स्वाक्षरीत/-**
**प्रकाश जयराम भंडारी**
**शिपायी**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

**प्रशासकिय टिप्पणी**

श्री प्रकाश जयराम भंडारी, शिपायी यांना गैरशिस्तीमुळे कार्यालयीन आदेश क्रं. आस्था-/३७४२/२००६ दिनांक २१.०६.२००६ अन्वये निलंबीत करण्यात आले होते त्यांची एक वार्षीक वेतनवाढ कायमस्वरुपी गोठवुन निलंबन काळ म्हणुन गृहीत धरुन त्यांना कार्यालयीन आदेश क्रं. नारवाशमनपा/आस्था-१/१४६७८/२००७ दिनांक ०८.०२.२००७ अन्वये त्यांची पुर्नस्थापन अभिलेखे विभागात करण्यात आली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ५६(२) ब नुसार आयुक्तास महानगरपालिकेने नेमलेल्या कोणत्याही अधिका-यांवर/कर्मचा-यांवर शास्ती पैकी कोणतीही शास्ती लादता येईल त्यानुसार संबंधीतास उक्त अधिनियमातील ५६(२) ब मधील तरतुदीनुसार किरकोळ शास्ती लादण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ५६ (४) पोट कलम (१) च्या परंतुका खंड (ड) च्या तरतुदीच्या अधिन राहुन ज्या कोणत्याही नगरपालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यांस महानगरपालिका व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्राधिका-यांकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, तर त्यास खालच्या पदावर आणण्याच्या काढून टाकण्याच्या किंवा बडतर्फ करण्याचा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिण्याच्या आत ज्या प्राधिका-यांने शास्ती लादली असेल त्यांच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपिल करता येईल अशी तरतुद आहे.

करिता संबंधीतावर लादलेली शास्ती किरकोळ स्वरुपाची असल्यामुहे ती रद्द किंवा त्यात बदल करता येणार नाही.

**सभापती** संबंधीताची अपिल मंजुर करण्यात येतो आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात यतो.

**ठराव क्रं.५९** **ठराव**

श्री प्रकाश जयराम भंडारी, शिपायी नावाशमनपा नांदेड यांनी कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/आस्था-१/१४६७८ दिनांक ०८.०२.२००७ चे आदेशा विरुध्द केलेली अपिल मंजुर करुन संबंधीतांचा निलंबन कालावधी कर्तव्य काळ गृहीत धरुन व एक वार्षीक वेतनवाढ कायम स्वरुपी बंद केलेली पुर्ववत चालु करण्यास मान्यता देण्यात येतो आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.१०** **प्रस्ताव**

मनपा हद्दीत प्रभाग क्रं. २८ मध्ये (१) भारत विद्यालय चौरस्ता ते आंबेडकर वाचनालय पर्यंतज आरसीसी नाली व स्लॅब चे बांधकाम करणे (२) रजानगर भागात श्री सलाम भंगारवाला यांचे घर ते अब्दुल्लाह कापडवाला यांचे घरा पर्यंत व श्री अमीन भंगारवाला ते अब्दुल वहाब यांचे घरा पर्यंत मलनिस्सारण लाईन टाकण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते

**सुचक:**- फारुख हुसेन कासीम साब **अनुमोदक** :- इशरत फातेमा अब्दुल शमीम

**सभापती** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो आयुक्तांनी पुढील नियमानुसार कार्यवाही करावी

**ठराव क्रं.६०** **ठराव**

मनपा हद्दीत प्रभाग क्रं. २८ मध्ये (१) भारत विद्यालय चौरस्ता ते आंबेडकर वाचनालय पर्यंतज आरसीसी नाली व स्लॅब चे बांधकाम करणे (२) रजानगर भागात श्री सलाम भंगारवाला यांचे घर ते अब्दुल्लाह कापडवाला यांचे घरा पर्यंत व श्री अमीन भंगारवाला ते अब्दुल वहाब यांचे घरा पर्यंत मलनिस्सारण लाईन टाकण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.११** **प्रस्ताव**

तरोडा झोन अ अंतर्गत JNNURM योजने अंतर्गत प्रभाग क्रं. ७ मध्ये तरोडा खु पाणी पुरवठा पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झालेले असुन कांही भागा मध्ये (ओंकारनगर, वर्धमान कालनी, वृध्दाश्रम परिसर) पाणी पुरवठा सुरळीत ाहेत नसल्यामुहे मालेगांव रोड ते कंतेवार यांचे घरा पर्यंत गचतीमधुन १५० एमएम व्यासाची पाणी पुरवठा पाईपलाईन टाकण्यासाठी हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचकः**- सौ. गंगासागर अन्नेवार **अनुमोदक** :- संजय गंगाधरराव मोरे

**सभापती** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो आयुक्तांनी पुढील नियमानुसार कार्यवाही करावी

**ठराव क्रं.६१** **ठराव**

तरोडा झोन अ अंतर्गत JNNURM योजने अंतर्गत प्रभाग क्रं. ७ मध्ये तरोडा खु पाणी पुरवठा पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झालेले असुन कांही भागा मध्ये (ओंकारनगर, वर्धमान कालनी, वृध्दाश्रम परिसर) पाणी पुरवठा सुरळीत ाहेत नसल्यामुहे मालेगांव रोड ते कंतेवार यांचे घरा पर्यंत गचतीमधुन १५० एमएम व्यासाची पाणी पुरवठा पाईपलाईन टाकण्यासाठी हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते. आयुक्तांनी पुढील नियमानुसार वैद्यानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.१२** **प्रस्ताव**

सिडको झोन डी अंतर्गत JNNURM योजने अंतर्गत मलनिस्सारण व पाणी पुरवठा पाईपलाईन टाकण्याचे काम चालू आहे. वसरणी प्रभाग क्रं. ३६ मध्ये कांही भाग/अंतर्गत रस्ते वरील योजनेतुन विसरुन राहीले आहेत त्यामुळे जो भाग/अंतर्गत रस्ते वंचीत राहू नये म्हणुन बचती मधुन भाग मलनिस्ससारण व पाणी पुरवठा पाईपलाईन टाकण्यासाठी हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचकः**- संजय गंगाधरराव मोरे **अनुमोदक** :- सौ. गंगासागर अन्नेवार

**सभापती** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो आयुक्तांनी पुढील नियमानुसार कार्यवाही करावी

**ठराव क्रं.६२** **ठराव**

सिडको झोन डी अंतर्गत JNNURM योजने अंतर्गत मलनिस्सारण व पाणी पुरवठा पाईपलाईन टाकण्याचे काम चालू आहे. वसरणी प्रभाग क्रं. ३६ मध्ये कांही भाग/अंतर्गत रस्ते वरील योजनेतुन विसरुन राहीले आहेत त्यामुळे जो भाग/अंतर्गत रस्ते वंचीत राहू नये म्हणुन बचती मधुन भाग मलनिस्ससारण व पाणी पुरवठा पाईपलाईन टाकण्यासाठी हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते. आयुक्तांनी पुढील नियमानुसार वैद्यानिक कार्यवाही करावी.

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे आजची सभा संपल्याचे जाहीर करण्यात येते.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**
नावाशमनपा नांदेड

**स्वाक्षरीत/-**
**सभापती**
स्थायी समिती
नावाशमनपा नांदेड